अर्थसंकल्पिय तरतूदींचे पुनर्वितरण सन २०१८-२०१९ मुख्य लेखाशीर्ष मागणी क्रमांक एस-४, ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक: नबाब-२०१८/प्र.क्र.९१/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन संकुल, ९ वा मजला,

लोकमान्य टिळक रोड, नविन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

दिनांक : ३१ मार्च, २०१९.

वाचा : सह सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक झेड-२८०१६/२०/२०१७-पीएमएसएसवाय-II/ईओ-३१११६३८, दिनांक १३.८.२०१८

<u>प्रस्तावना :</u>

प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना (फेज-३) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, लातूर, अकोला व यवतमाळ या ४ संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. सदरहू योजनेत राज्य शासनास प्रतिसंस्था रु.३०.०० कोटीप्रमाणे ४ संस्थेसाठी एकूण रु. १२०.०० कोटी उपलब्ध करुन दयावयाचे आहेत. सदर योजनेच्या अनुषंगाने उपरोक्त केंद्र शासनाच्या दिनांक १३.८.२०१८ च्या पत्रान्वये निश्चित करण्यात आलेल्या राज्या हिश्श्याच्या सुधारित वाटपानुसार बांधकामासाठी रु.७५.०० कोटी व यंत्रसामुग्री खरेदीअंतर्गत रु.४५.०० कोटी इतका निधी केंद्र शासनाच्या नोडल एजन्सींना उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. सबब उक्त लेखाशीर्षाअंतर्गत मार्च २०१८ मध्ये मागणी क्रमांक एस-४, ४२१० २३९४, “५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री” या उद्दिष्टांतर्गत रु. ६०.०० कोटी निधीपैकी रु. १५.०० कोटी इतका अर्थसंकल्पीत निधी त्याच उप लेखाशीर्षाअंतर्गत “५३- मोठी बांधकामे” या उद्दिष्टांतर्गत पुनर्वितरणाद्वारे उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे

<u>शासन निर्णय</u> :-

प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना (फेज-३) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्य हिस्सा म्हणून मार्च २०१८ मध्ये मागणी क्रमांक एस-४, ४२१० २३९४, या मुख्य लेखाशीर्षाअंतर्गत “ ५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री” या उद्दिष्टांतर्गत अर्थसंकल्पीत रु.६०.०० कोटी पैकी रु.१५.०० कोटी

इतकी रक्कम त्याच उप लेखाशीर्षाखाली "५३- मोठी बांधकामे" या उद्दिष्टांतर्गत सोबतच्या "अ" व "ब" मधील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे पुनर्वितरीत करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १४०/२०१८/व्यय-१३, दिनांक २८ मार्च, २०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३३११४४८५५६११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सोबत : विवरणपत्र अ व ब.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2019.03.31 14:59:04 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल-२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा.संचालक (PMSSY Division), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
७. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला/यवतमाळ /लातूर व औरंगाबाद.
८. सर्व सह/उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव (अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (प्रशा-१).

<u>विवरणपत्र - अ</u>

शासन निर्णय, क्रमांक : नबाब-२०१८/प्र.क्र.९१/प्रशा-१, दि. ३१.०३.२०१९ सोबतचे विवरणपत्र-अ

(रुपये हजारात)

अ. क्र.	पुनर्वितरणामुळे वाढ झालेले लेखाशीर्ष	मुळ अर्थसंकल्पित तरतूद	पुनर्वितरणाची एकूण रक्कम (+)	पुनर्वितरणा नंतर शिल्लक सुधारित तरतूद	अभिप्राय
१	मागणी क्रमांक एस-४, ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना फेज-III (राज्य हिस्सा २०%) ४२१० २३९४ - दत्तमत ५३- मोठी बांधकामे	६०००००	१५००००	७५००००	प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना (फेज-३) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, लातूर, अकोला व यवतमाळ या ४ या संस्थेच्या बांधकामांकरीता केंद्र शासनाने दिनांक १३.०८.२०१८ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सुधारित वाटपानुसार ५३- मोठी बांधकामे या उद्दिष्टाखाली ५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टाअंतर्गत मंजूर तरतूदीतून रु.१५०० लक्षाचे पुनर्वितरण करण्यात येत आहे.

विवरणपत्र -ब

शासन निर्णय क्रमांक : नबाब-२०१८/प्र.क्र.९१/प्रशा-१, दि. ३१.०३.२०१९ सोबतचे विवरणपत्र-ब

(रुपये हजारात)

अ. क्र.	पुनर्वितरणामुळे घट झालेले लेखाशीर्ष	मुळ अर्थसंकल्पित तरतूद	पुनर्वितरणाची एकूण रक्कम (-)	पुनर्वितरणा नंतर शिल्लक सुधारित तरतूद	अभिप्राय
१	मागणी क्रमांक एस-४, ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना फेज-III (राज्य हिस्सा २०%) ४२१० २३९४- दत्तमत ५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री	६०००००	१५००००	४५००००	प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजना (फेज-३) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, लातूर, अकोला व यवतमाळ या ४ या संस्थेच्या बांधकामांकरीता केंद्र शासनाने दिनांक १३.०८.२०१८ च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सुधारित वाटपानुसार ५२- यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टाखालील मंजूर तरतूदीतून ५३- मोठी बांधकामे या उद्दिष्टाअंतर्गत रु.१५०० लक्षाचे पुनर्वितरण करण्यात येत आहे.
